१३ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून एसएनसीयू, एनआयसीयू, एनबीएसयू उपकरणे अंतर्गत फोईटल मॉनिटर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०२१९/प्र.क्र.१५५/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ११ मार्च, २०१९.

वाचा :-

१) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१ यांच्याकडील जा.क्र.राकुकका/माता आरोग्य कक्ष १०-ब/न.क्र./१६५३ Foetal Monitor Letter /१११८७-८९, दिनांक १२.०२.२०१९.

२) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१ यांच्याकडील जा.क्र.राकुकका/माता आरोग्य कक्ष १०-ब/न.क्र./१६५३ Foetal Monitor Letter/२०१८/ ३२७५९-६१, दिनांक २५.०५.२०१८.

३) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील पत्र क्र.राआआअ/आरसीएच-१/१३ व्या वित्त आयोग/४७८१२-८२५/१५, दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१५.

४) शासन परिपत्रक क्र.साआवि-३००११/१०८/२०१३-आ.७ दिनांक १३.०३.२०१५.

५) शासन पत्र क्र.साआवि-३००११/१०८/२०१३/आ-७, दिनांक १७.०१.२०१५.

प्रस्तावना :-

१३ व्या वित्त आयोगाकडून अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी प्राप्त अनुदानातून एसएनसीयू, एनआयसीयू, एनबीएसयू उपकरणे अंतर्गत १६५३ नग फोईटल मॉनिटर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झालेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय संनियत्रण समितीच्या बैठकीत सुधारित कृती आराखडा तयार केलेला असून त्यानुषंगाने मंजुर करण्यात आलेल्या एकूण रु.२३१.४५ कोटी अनुदानाचा विनियोग करण्याबाबत दि.१३/०३/२०१५ च्या शासन निर्णयानूसार मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी दि.१७/१०/२०१५ च्या पत्रानूसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झालेल्या रक्कम रु.२३१.४५ कोटी इतक्या निधीतून करावयाच्या विनियोगाच्या सुधारित आराखडयानूसार साधन सामुग्री व उपकरणे खरेदी करण्याकरीता विहित प्रक्रियेचा अवलंब करुन (ई-टेंडरद्वारे) कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानूसार अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१ यांनी प्रस्तावित केल्यानूसार फोईटल मॉनिटर खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ) अनुदानाचा तपशिल :-

अ. क्र.	अनुदानाचा प्रकार	खरेदीची बाब	मंजूर निधी (रुपये लाखात)	खरेदी प्रस्ताव (रुपये लाखात)
१	१३ व्या वित्त आयोगातील प्राप्त निधी (रु.२३१.४५ कोटी)	Procurement of Foetal Monitor	१८५१.३६	१८५१.३६

ब) खरेदी प्रस्ताव :-

अ.क्र	खरेदी करायची बाब	खरेदी संख्या	अंदाजित दर (रुपयात)	प्रस्तावित खरेदीची रक्कम (लाखात)
१	फोईटल मॉनिटर	१६५३	१,१२,०००/-	१८५१.३६

उपरोक्त प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी

करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन आणि वस्तुसूची व्यवस्थापन योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झालेल्या रक्कम रु.२३१.४५ कोटी इतक्या निधीतून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. खरेदी -२०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा

अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१२४३०२७११७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001,
street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI,
serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.11 10:46:28 +05'30'

(निलेश फाळके)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)